# जनसंपर्क अधिकारी

## पोलीस आयुक्तालय, मिरा-भाईदर, वसई-विरार

पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

**कार्यालयाचा पत्ता-** रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि. ठाणे फोन नंबर ०२२ - २९४५१००१

**Email ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट ०८/२०२५ दि. ०७/०१/२०२५

### Telegram Group वरील Share Trading मध्ये गुंतवणुक करण्यास सांगुन फसवणुक झालेली एकुण २,५५,१०७/- रुपये तक्रारदार यांना परत करण्यात सायबर पोलीस ठाण्यास यश !!

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील वसई पोलीस ठाणेचे हद्दीतील तक्रारदार नामे श्री.चौधरी यांनी टेलीग्राम ॲपवर शेअर ट्रेंडिंगमध्ये गुंतवणुक करुन अधिक नफा मिळविण्याबाबत जाहिरात पाहिली. जाहिरातीमध्ये पाहिलेल्या टेलीग्राम ग्रुप मध्ये जॉईन झाल्यानंतर तक्रारदार यांनी नफा मिळविण्याचे उद्देशाने **रक्कमेची गुंतवणुक केली** परंतु त्यांना कोणताही परतावा मिळाला नाही.आपली आर्थिक फसवणुक झाल्याचे तक्रारदार यांचे लक्षात आल्याने त्यांनी सायबर पोलीस ठाणे येथे तक्रारी अर्ज सादर केल्याने सदरबाबत नोंद घेवुन तक्रारदार यांची **NCCRP Portal** वर तक्रार नोंदविण्यात आली.

तक्रारदार यांची ऑनलाईन NCCRP Portal वर तक्रार नोंदविल्याने फसवणुकीची वर्ग झालेली रक्कम संशयीत बँक खात्यात थांबविण्यात आली. तक्रारदार याची बँक खात्यांमध्ये थांबविण्यात आलेली रक्कम परत मिळविण्याकरीता मा. न्यायालयमध्ये अर्ज सादर करण्याबाबत तक्रारदार यांना सुचना देण्यात आल्या. तक्रारदार यांनी त्यांची फसवणुकीची रक्कम परत मिळविण्याकरीता मा. न्यायालयात याचिका दाखल केली होती, त्याबाबत सायबर पोलीस ठाणे यांनी मा. न्यायालयामध्ये सविस्तर अहवाल सादर केला व मा. न्यायालयाचे आदेश प्राप्त केले.

अश्याप्रकारे सायबर पोलीस ठाणे यांनी बँकेसोबत तसेच मा.न्यायालय यांचेकडे सातत्याने पाठपुरावा करुन तक्रारदार यांची फसवणुक झालेली रुपये २,५५,१०७/- रक्कम त्यांचे मुळ खात्यात परत मिळविण्यात आलेली आहे.

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- **Telegram Channel, facebook, Watsapp, Instagram अथवा वर जास्त परतावा देणा-या Promotional Adds वर विश्वास ठेवु नका. याद्वारे आपली आर्थिक फसवणुक होण्याची शक्यता आहे.**
- **अश्या प्रकारच्या फसवणुकीमध्ये Telegram Channel, Watsapp Group वर ॲड करुन तेथे इतरांना कसा फायदा होत आहे याचे Sceenshot, Massages दाखवुन पैसे गुंतवणुक करण्यास प्रवृत केले जाते. गुंतवणुकदारांचा विश्वास संपादन करण्यासाठी सेबीची बनावट प्रमाणपत्रे दाखवुन फसवणुक करण्यात येते. एकदा गुंतवणुकदारांचा विश्वास जिंकला की, हे लोक गुंतवणुकदारांना जास्त व खात्रिशिर परताव्याची हमी देतात. अशा गुंतवणुकीमध्ये आर्थिक फसवणुक होण्याचा धोका मोठया प्रमाणात असतो.**
- **जास्त परतावा देण्याचे आमिष दाखविणा-या कोणत्याही ट्रेंडिंग ॲपवर विश्वास ठेवु नये. तसचे ट्रेंडिंग ॲपची विश्वासार्हता तपासुन गुंतवणुक करु नये.**
- **Share Market, Forex Trading, Crypto Investment, Mutual Funds मधील गुंतवणुक करण्याअगोदर आपल्या वितीय सल्लागारासोबत चर्चा करुनच गुंतवणुक करा.**
- **कोणतेही अनाधिकृत Investment ॲप्लीकेशन डाऊनलोड करु नये अथवा अनोळखी लिंकवर क्लिक करुन नये.**
- **आपली वैयक्तिक तसेच बँकेसंबंधीत गोपनीय माहिती कोणासही उघड करु नये.**
- **ऑनलाईन फसवणुक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, सपोनि/ स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर, सफौ/मिलाग्रिस फर्नांडिस, पोअं/सावन शेवाळे, पोअं/प्रशांत बोरकर मपोहवा/माधुरी धिंडे यांनी पार पाडली आहे.

**सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांक :- १९३०**

**सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईट :- www.cybercrime.gov.in**


ELL - MBVV
FUND TREE
CYBER CRIME CELL - MBVV
MONEY REFUND TREE
महाराष्ट्र पोलीस
CYB ICE STATIO
CYBER POLICE STATION
Mira-Bhayandar, Vasai-Virar Police Commissionerate
Refund Amount : 2,55,107/-
Kind Thanks By : KULDEEP

------------00000--------------